G/DEP/07/09/01

**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८**
**अंतर्गत अभियोग दाखल करण्यास**
**<u>मंजुरी देण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.अभियो-१३०८/प्र.क्र.३४/०८/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ४ जुलै, २००९

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक-सीडीआर-१०९९/प्र.क्र.६२/९९/११-अ, दिनांक ३ एप्रिल, २०००
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक-सीडीआर-१०९९/प्र.क्र.६२/९९/११-अ, दिनांक १६ मार्च, २००१
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक-अभियो-१००६/प्र.क्र.११/०६/११-अ, दिनांक २३ जुलै, २००७

**<u>शासन निर्णय :-</u>**

लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १९ मध्ये खटल्यासाठी कोणाची पूर्वमंजुरी आवश्यक आहे ते नमूद केले आहे. त्यानुसार राज्याच्या व्यवहाराशी संबंधित सेवेमध्ये असलेल्या व राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय सेवेतून काढून टाकता न येणाऱ्या व्यक्तिंच्या बाबतीत त्या शासनाची इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत त्याला त्याच्या पदावरुन काढून टाकण्याबाबत सक्षम असलेल्या प्राधिकरणाची पूर्वमंजुरी असल्याशिवाय न्यायालय अपराधाची दखल घेणार नाही हे लक्षात घेता, अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी उपरोक्त अनु.क्र.१ येथील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये कोण राहतील याबाबत तरतुदी करण्यात आल्या होत्या. त्यातील परिच्छेद १ (३) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद होती.

| | | |
|---|---|---|
| ३ | अन्य संस्था (उदा.महामंडळे/मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था) ज्यांना शासनाचे अर्थसहाय्य देण्यात येते. | संबंधित संस्थाचे अध्यक्ष / संचालक इत्यादी. |

जिल्हाधिकारी रत्नागिरी
शाखा:-
आवक नं. 85
का. नि. नं.:- 2
23 JUL 2009
तहसिलदार उप जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी
23/07/09
26898
आस्थापना शाखा
टपाल प्राप्त झाल्याचा दिनांक 30/7/09
संकलन:- आस्थापना:- II

०१/DCP/०४/०५/०१



विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ मधील परिच्छेद १ (३) मधील तरतुदीअन्वये कामकाज करत असताना अडचणी येत असल्याने परिच्छेद १ (३) मध्ये पुढीलप्रमाणे बदल या शासन निर्णयान्वये करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ३ | ज्यांना शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते अशा अन्य संस्थामधील (उदा.महामंडळे/मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था) शासकीय अधिकारी / कर्मचारी | संबंधित संस्थाचे अध्यक्ष, संचालक इत्यादी किंवा विशिष्ट आदेशाद्वारे/अधिनियमाद्वारे सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे असा कोणताही अधिकारी. |

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०७०४१५५४४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र.ल.पाठक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालाचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती